स्पीड पोष्टाने

क्रमांक : डब्ल्यूएल पी-१००९/प्र.क्र. २० /फ-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२१ मार्च, २००९

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा
सदस्य सचिव, राज्य वन्यजीव मंडळ,
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय :-** राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाची ४ थी बैठक
कार्यवृत्तांतास मान्यता देण्याबाबत ...

**दि.२०/२/२००९ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे** राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाची ४ थी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे ईमेलद्वारे आपण मान्यतेसाठी सादर केलेल्या कार्यवृत्तांतास, सोबत जोडल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. आपणास विनंती की, तदनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

(शिरीष राणे)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

सहपत्र वरील प्रमाणे

क्र. 2.3(६)
तारीख 27/3/09

प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) म. रा. नागपूर
6 फरक नाही

# कार्यवृत्तांत



महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची ४ थी बैठक दिनांक २०-२-२००९ रोजी सहयाद्री विश्रामधाम, मलबार हिल मुंबई येथे मा. मंत्री (वने) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीतील उपस्थितांची नावे सोबतच्या यादीत दिलेली आहेत. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर तथा सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विषयसूचीनुसार बैठकीत देण्यात आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

| अक्र | मुद्दा | बैठकीत देण्यांत आलेली माहिती | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| **यापूर्वीच्या बैठकीतील कार्यवाहीचे मुद्दे** | | | |
| १ | जायकवाडी अभयारण्यः कालबध्द पध्दतीने या अभयारण्यातील समस्यांचा अभ्यास पूर्ण करण्यात यावा. उदा. मासेमारी, गाळपेरा इत्यादि | सदर अभ्यास यशदा मार्फत करुन घ्यावयाचा होता. तथापी, यशदाने त्याबाबत असमर्थता दर्शविली आहे. स्थानिक संस्था WALMI व MPCB यांनी सुध्दा असमर्थता कळविली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि श्री दिलीप यार्दी, राज्य वन्यजीव मंडळ सदस्य यांनी अभ्यास प्रस्ताव सादर केला आहे. हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी सांगितले. | श्री. दिलीप यार्दी, मंडळ सदस्य यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सहकार्याने अभ्यास अहवाल सादर केलेला आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी असे सूचीत केले की, सदर अभ्यासाकरिता रूपये ६.७५ लाख खर्च लागेल. मा. मंत्री (वने) यांच्या आदेशान्वये मत्स्य व्यवसाय विभाग आणि पाटबंधारे विभाग यांनी सदरच्या अभ्यासाकरिता आर्थिक मदत देण्यास सहमती दर्शविली. मत्स्य व्यवसाय विभाग व पाटबंधारे विभागाचे प्रतिनिधी मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांची भेट घेतील व याबाबतची रूपरेषा एक आठवडयाच्या आंत निश्चीत करतील असे ठरविण्यांत आले. |
| २ | प्रस्तावित इसापूर पक्षी अभयारण्यः पाटबंधारे विभागासोबत पाठपुरावा करुनही तातडीने निर्णय न झाल्यास मा. अध्यक्षांच्या कार्यालयास कळविण्यात यावे. | केन्द्र शासनाने वर्ष १९९५ मध्ये उर्ध्व पैनगंगा प्रकल्पास (ईसापूर धरण) मान्यता देतांना- १, ईसापूर जलाशय परिसरात पक्षी अभयारण्य स्थापन करण्यासाठी सिंचन विभागाने मान्यता द्यावी, २. वन्यप्राणी समूहावरील संभाव्य अनिष्ट परिणाम कमी करण्याच्या दृष्टिने कार्य आराखडा तयार करावा आणि ३. शिकार प्रतिबंधक घटक स्थापन करणे हया तीन अटी नमूद केल्या होत्या. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी १३१.५५ चौ.कि.मी क्षेत्रात अभयारण्य निर्मितीचा प्रस्ताव शासनास १९९९ ला सादर केला होता. उक्त तिन्ही अटींची पूर्तता त्या प्रस्तावात होत होती.<br>तथापि, उपसा सिंचन, बिगर सिंचन पाणी | मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक आणि मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांनी दिनांक ६ व ७ मार्च २००९ रोजी एकत्रीत तपासणी करून त्यांचा ईसापूर अभयारण्याबाबतचा प्रस्ताव ते १५ दिवसाचें आंत सादर करतील असे ठरविण्यांत आले. ईसापूर अभयारण्याच्या स्थापनेकरिता लागणारा निधी जलसंधारण विभागामार्फत उपलब्ध करून दिल्या जाईल असे सचिव (जलसंपदा) यांनी आश्वासन दिले. |

128

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुरवठा, गाळपेरा, मत्स्य व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, नौकानयन, जलक्रीडा यावर कोणतीही बंधने सिंचन विभागास नको होती. नंतर शासनाने दि.१७-५-२००८ च्या पत्रान्वये खालील मुद्यांवर अहवाल/अभिप्राय मागविला.<br>१. बुडित क्षेत्राचा फक्त काही भाग अभयारण्यात समाविष्ट करण्यात यावा जेणेकरुन मत्स्य व्यवसाय व उपसा जल सिंचन सुरु राहील.<br>२. गाळपेरा कल्टीव्हेशनमध्ये बाधा येणार नाही असाच ड्रॉ डाऊन लेव्हलचा भाग अभयारण्यात ठेवावा.<br>३. बुडीत क्षेत्राशेजारील भाग (राखीव वन व वनेतर) अभयारण्यात समाविष्ट करावा.<br>मा. वन मंत्री आणि मा. जलसंपदा मंत्री यांचे अध्यक्षतेखाली नागपूर येथे दिनांक २२-१२-२००८ ला याविषयावर बैठक झाली आणि अभयारण्याचा सुधारित प्रस्ताव तयार करण्याचे ठरले. त्यास अनुसरुन जलसंपदा विभागासोबत संयुक्त पाहणी करुन सुधारीत प्रस्ताव करण्याची कार्यवाही चालू आहे.<br>दरम्यान जलसंपदा विभागाने बुडीत क्षेत्राशेजारील वन व वनेतर क्षेत्र प्रस्तावित ईसापूर पक्षी अभयारण्यात समाविष्ट करण्यास सहमती दर्शविली आहे. तथापि, केंद्र शासनाच्या अटीनुसार पक्षी अभयारण्य स्थापित करण्यासाठी आवश्यक असणारा निधी जलसंपदा विभागाने अद्याप वन विभागास दिलेला नाही. | |
| ३ | पेंच (मानसिंगदेव) अभयारण्याची निर्मितीः- | संयुक्त पाहणी झाल्यानंतर त्याप्रमाणे अभयारण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या संदर्भात शासनाच्या निर्देशानुसार स्थानिक आमदारांशी सल्लामसलत करण्यात येत असल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)यांनी सांगितले. | या महिन्यात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) हे श्री. सुनिल केदार, मा. आमदार यांचे समवेत समन्वय साधून अंतीम अहवाल शासनास सादर करतील असे ठरविण्यांत आले. |
| ४ | कोपेला कोलामार्का संवर्धन/ सामुदायीक राखीव क्षेत्र | कन्झर्वेशन रिझर्व तयार करण्यासाठी श्री दिलीप गोडे, राज्य वन्यजीव मंडळ सदस्य यांच्याकडून अंतीम अहवाल प्रतिक्षित आहे.<br>या दरम्यान वाईल्ड लाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली या संस्थेने या क्षेत्राचा प्राथमिक | श्री. दिलीप गोडे यांनी सहा महिन्याचे आंत अहवालांस अंतीम स्वरूप देण्याचे मान्य केले. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) हे वाईल्ड लाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना रानम्हशींच्या |

(27)

| | | | |
|---|---|---|---|
| | स्थापन करणे: श्री दिलीप गोडे, मंडळ सदस्य यांनी गावभेटींचा कार्यक्रम पूर्ण करणे | अभ्यास केलेला आहे. त्यांच्या अधिका-यांशी नागपूर येथे चर्चा करण्यात आली असून सदर क्षेत्रात रानम्हशी संवर्धनासाठी सदर संस्थेकडून कृती आराखडा तयार करण्यात येत असल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी सांगितले. | संवर्धनाबाबतची योजना तयार करण्याबाबतची विनंती करतील |
| ५ | वन्यजीव क्षेत्राकरीता वाढीव अनुदान | वर्ष २००७-०८ आणि २००८-०९ मध्ये राज्य योजनेत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. रु. लाखात<br>वर्ष / राज्य योजना / केंद्र योजना<br>०७-०८ / १३४२.५२ / ९०६.१८<br>०८-०९ / ३५८४.७० / ११८४.६८<br>वर्ष ०८-०९ मध्ये जिल्हा योजना अंतर्गत रु.८३०.५८ लाखाचे अनुदान प्राप्त झाले आहे. | वन्यप्राण्यांच्या संवर्धनाकरिता मिळणा-या अनुदानामध्ये वाढ झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व त्याकरिता मा. मंत्री (वने) यांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल सर्व सदस्यांनी त्यांच्या बद्दल गौरवोदगार काढले. |
| ६ | अ) संरक्षित क्षेत्रांचा विस्तार तसेच गावांचे पुनर्वसन : बाधितांसाठीच्या केन्द्रीय अनुदानाची मर्यादा रुपये ५ लाखापर्यंत वाढविण्यासाठी पाठपुरावा करणे. | केन्द्र शासनाने व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील तसेच अन्य संरक्षित क्षेत्रातीलही बाधीत कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी अनुदानाची मर्यादा रुपये १० लाख इतकी केलेली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांचे पूनर्वसनाचा प्रस्ताव केंद्रशासनास सादर झाला आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील गावांचे पुनर्वसनाचा आणि पेंच व्याघ्र प्रकल्पातील एका गावाचे पुनर्वसनाचा प्रस्ताव केंद्रशासनास पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.<br>अन्य अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानातील धोकाग्रस्त अधिवास क्षेत्र निश्चिती करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अनुसूचित जमाती आणि अन्य पारंपारिक वननिवासी (वन हक्कांना मान्यता) अधिनियम २००६ अंतर्गतही कार्यवाही प्रगतीवर आहे. | अभयारण्ये / राष्ट्रीय उद्याने येथील गावांचे पुनर्वसन करण्याबद्दल सर्व सदस्यांनी कळकळ व्यक्त केली. |
| | ब) ताडोबा अंधारी व्याध्र प्रकल्पांतर्गत कालापाणी क्षेत्रात कंझर्वेशन रिझर्व निर्माण करणे, गावक-यांशी चर्चा करणे. | सदर क्षेत्राचा समावेश व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात होत असल्याने वेगळयाने कंझर्वेशन रिझर्व जाहीर करणे आवश्यक नाही. | श्री. हर्षवर्धन धनवटे यांनी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बफर झोन क्षेत्र घोषीत करण्याच्या प्रस्तावास तात्काळ अधिसूचीत करणेबाबत विनंती केली, आणि मा. मंत्री (वने) यांनी तसे करण्यात येईल असे आश्वासन दिले. |
| | क) ताडोबा येथील पर्यटन | ताडोबा येथील वन विश्राम गृहासमवेत पर्यटन संकूल दिनांक १-४-२००८ पासून पर्यटकासाठी | वन विश्रामगृह, ताडोबा पर्यटन समूह ताडोबा येथून हलविण्याच्या कृतीचे सर्व |